## MAHARASHTRA ACT No. XI OF 1963.

## THE CENTRAL PROVINCES AND BERAR REFUGEES REHABILITATION (LOANS) (MAHARASHTRA REPEAL) ACT, 1962.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपति यांची संमति दिनांक ५ फेब्रुवारी १९६३ रोजीं मिळाली असल्यामुळें, तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे :—

**बी. पी. दलाल,**
महाराष्ट्र शासनाचे सचिव, विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XI OF 1963.

## AN ACT TO REPEAL THE CENTRAL PROVINCES AND BERAR REFUGEES REHABILITATION (LOANS) ACT, 1949.

## सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.

[ राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर, "महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रांत" दिनांक ९ फेब्रुवारी १९६३ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला. ]

## मध्यप्रांत व वऱ्हाडचा निर्वासित पुनर्वसन (कर्जें) अधिनियम, १९४९ रद्द करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थीं, मध्यप्रांत व वऱ्हाडचा निर्वासित पुनर्वसन (कर्जें) अधिनियम, १९४९ हा रद्द करणें इष्ट आहे; त्याअर्थीं, भारतीय गणराज्याच्या तेराव्या वर्षी, याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

**१.** या अधिनियमास मध्यप्रांत व वऱ्हाडचा निर्वासित पुनर्वसन (कर्जें) (महाराष्ट्रा-पुरता रद्द करण्याबाबत) अधिनियम, १९६२ असें म्हणावें. **लघु संज्ञा.**

**२.** महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ विभागास लागू असलेला, मध्यप्रांत व वऱ्हाडचा निर्वासित पुनर्वसन (कर्जें) अधिनियम, १९४९ (ज्याचा यांत पुढें "उक्त अधिनियम" असा उल्लेख केला आहे) याद्वारें रद्द करण्यांत येत आहे. **सन १९४९चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक १९ रद्द करणें.**

बचाव. ३. (१) उक्त अधिनियम रद्द करण्यांत आला तरी, त्या अधिनियमाचे उपबंध आणि तदन्वयें केलेले नियम व दिलेले आदेश, उक्त अधिनियमान्वयें मंजूर केलेलीं सर्व कर्जे (आणि त्यावरील व्याज) फेडण्यांत, वसूल करण्यांत किंवा जमेस लिहून टाकण्यांत येईपर्यंत, अशीं कर्जे (आणि त्यावरील व्याज) यांच्या परतफेडीच्या किंवा वसुलीच्या कारणासाठीं आणि वर सांगितलेल्या कोणत्याहि कारणांशीं संबंधित असलेल्या किंवा त्यास आनुषंगिक असलेल्या कोणत्याहि कारणासाठीं अंमलांत असण्याचे चालू राहील.

(२) पोट-कलम (१) मधील उपबंधांस बाध न येतां आणि त्यांस अधीन राहून, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम ७ चे उपबंध, जणू कांहीं तो अधिनियम महाराष्ट्र अधिनियमान्वयें रद्द केलेला अधिनियम आहे असें समजून उक्त अधिनियम रद्द करण्याच्या बाबतींत लागू होतील.

(True translation)
P. S. THORAT,
Examiner of Books and Publications, Bombay.